**सीएनआर क्र.एमएचएसआय ०७०००१९७२०२२**

**<u>नि.दि.मु.क्र.४३/२०२२ मधील नि.क्र.५ (आय.ए. क्र.१/२०२२) वरील आदेश</u>**

यातील वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एच.टी.चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला. दावा तसेच नि.क्र.५ कडील प्रस्तुत अर्जाचे संपूर्णपणे अवलोकन केले. वादीतर्फे नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीच्या कथनांचा व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचा सकृतदर्शनी विचार केला असता, यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांस प्रस्तुत अर्जाबद्दलची नोटीस दिल्याने विलंब झाल्यास, मनाई हुकुम देण्याचा उद्देश विफल होईल अशी परिस्थिती दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांचे प्रस्तुत अर्जावरील म्हणणे ऐकून न घेता त्यांचे विरुध्द कोणताही एकतर्फा तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही, असे माझे मत आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे प्रस्तुत अर्जाचे कामी म्हणणे घेऊनच पुढील योग्य तो आदेश करणे न्यायाच्या दृष्टीने उचित व हितावह ठरणारे आहे. याकारणास्तव, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१) यातील वादी मागत असलेली तुर्तातूर्त मनाईची दाद तिला का देणेत येऊ नये याकरिता प्रतिवादी क्र.१ व २ यांना कारणे दाखवा नोटीस काढणेत यावी.

२) यातील वादीने, मागितले असल्यास, तात्काळ आदेशिका शुल्क व स्वतंत्र बेलिफ मंजूर करणेत येत आहे.

३) नोटीस परतावा दिनांक २५/०४/२०२२

ADITYA G NAIK
Digitally signed by ADITYA G NAIK
Date: 2022.04.11 17:56:19 +0530

स्थळ : मालवण
दिनांक : ११/०४/२०२२

आदित्य घ. नाईक
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण